# अभ्युदय नगर
## सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ (मर्या.)
(नोंदणी क्रमांक : एमयुएम/एमएचएडीबा/एचएसजी/टीसी)१२४९२/सन २००६-२००७)

कार्यालय : समाज मंदीर हॉल, वीर श्रीकांत हडकर मार्ग, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई - ४०० ०३३.


जा. क्र. : १२५/२०१६-२०१७ दिनांक :०४.१०.२०१६

प्रति,

**मा.अध्यक्ष / सचिव,**

**अभ्युदयनगर ______________ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**

**व अभ्युदयनगर रहिवाशी बंधू - भगिनीनों....!**

**महोदय / महोदया,**

अभ्युदयनगर सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या एकत्रित पुनर्विकास प्रक्रियेतील एक एक टप्पा पार पाडताना आपल्या सर्व सभासद रहिवाशांच्या सहकार्यामुळे व पाठीब्यांमुळे यशस्वीरीत्या वाटचाल करत आहोत. आपण सर्व सभासद रहिवाशी व संघ यांच्या पुनर्विकास प्रक्रिया व सुधारित पुर्नप्रस्ताव यासाठी घेतलेल्या संयुक्त चर्चासत्रामध्ये उस्फुर्तपणे प्रतिसाद दिला व सहभाग घेतला याबद्दल आपणांसर्वांचे जाहिर आभार...!

अभ्युदयनगरचा एकत्रित पुनर्विकास हा केवळ एका संस्थेचा वा व्यक्तीचा नसून सर्व ४७ सभासद गृहनिर्माण संस्था व त्यांचे ३४१० सभासद रहिवाशांचा आहे. बहुसंख्य सभासद गृहनिर्माण संस्थांनी निवडलेला व निविदा बहाल केलेला विकासक मे.किस्टोन रिअल्टर्स प्रा.लि. (रुस्तमजी ग्रुप) चे संचालक श्री. चंद्रेश मेहता यांचेबरोबर चर्चासत्रामध्ये थेट संवाद साधून आपल्या शंकांचे निरसन करता आले. त्यामुळे आपले निश्चितच समाधान झाले असेल असे वाटते.

चर्चासत्रानंतर संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २८.०९.२०१६ रोजी सभासद गृहनिर्माण संस्थेच्या प्राधिकृत प्रतिनिधी समवेत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सदर सभेमध्ये संघाच्या उपविधीमध्ये दुरुस्ती करुन सर्वसाधारण सभेमध्ये भाग घेण्याकरिता सभासद संस्थेच्या ४ (चार) प्राधिकृत सभासदांऐवजी सर्व कार्यकारणीला भाग घेण्यास परवानगी द्यावी अशी सभासदांकडून सुचना आली. त्यावर संघाचे अध्यक्ष व व्यवस्थापन समिती यांनी एक पाऊल पुढे जाऊन सभासद गृहनिर्माण संस्थांचे सर्व कार्यकारी मंडळ अधिक ४ (चार) अधिकृत सभासद यांना संघाच्या सर्वसाधारण सभेमध्ये भाग घेता येईल अशी सुचना केली. त्यावर सभागृहाने जाहिर पाठींबा दिला. परंतु अध्यक्षांनी सुचित केले की, सहकार कायदा सन १९६० अन्वये उपविधीमध्ये दुरुस्ती करण्याचा अधिकार हा विशेष / वार्षिक सर्वसाधारण सभेला असून तो स्वतंत्र विषयपटलावर असावा लागतो. त्यासाठी येत्या १५ दिवसांत सदर सभेचे आयोजन करुन उपविधी दुरुस्तीचा विषय घेता येईल. त्यासाठी सभासद गृहनिर्माण संस्थांनी संघाच्या कामकाजात भाग घेण्यासाठी प्राधिकृत सभासद म्हणून सभासद संस्थेची सर्व कार्यकारिणी अधिक ४ अधिकृत सभासद यांचा समावेश करावा व संघाच्या उपविधीमध्ये तशी दुरुस्ती करावी असे पत्राने ८ दिवसांत संघ कार्यालयात कळवावे असे आवाहन केले. त्यास सभागृहाने एक मताने संमती दिली.

अभ्युदयनगर एकत्रित पुनर्विकासाच्या अनुषंगाने विकासकाकडून आलेल्या सुधारित पुनर्विकास प्रस्तावावर तांत्रिक व कायदेशीर बाबींमध्ये लवकरच वास्तुविशारद व विधीतज्ञ यांचेकडून माहिती उपलब्ध होईन. ती आपणांस लवकरात लवकर कळविण्यात येईल तसेच विशेष सर्वसाधारण सभेमध्ये वास्तुविशारद व विधीतज्ञ समवेत चर्चासत्र घेऊन प्रत्यक्ष चर्चा करण्याचा संघाचा मानस आहे.

मध्यतंरीच्या काळात सभासद गृहनिर्माण संस्थांच्या काही सभासदांनी सहकार आयुक्त, पुणे यांचेकडे तक्रार करुन मुंबई मधील अभ्युदयनगर या म्हाडा वसाहतीच्या सध्या चालू असलेली पुनर्विकास प्रक्रिया बेकायदेशीर, नियमबाह्य व अपारदर्शक पद्धतीने राबविण्यात येत असल्यामुळे याबाबत सखोल चौकशी करुन स्थगिती बाबत योग्य तो आदेश देणेबाबत मागणी अर्ज केला होता.

परंतु आपणांस कळविण्यात आनंद वाटतो की, मा.सहकार आयुक्त, पुणे यांनी नेमलेल्या चौकशी अधिकाऱ्यांनी संघाचे दफ्तर तपासले व सदर अभ्युदयनगरमधील पुनर्विकास प्रक्रिया ही पुर्णता कायदेशीर आहे व अभ्युदयनगर सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ (मर्या.) व सभासद संस्थांनी एकत्रित पुनर्विकासाबाबत सभासदांच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेतलेला आहे यावर शिक्कामोर्तब केले. सदर पत्राची प्रत आपल्या माहितीकरीता जोडत आहोत.

विकासकाकडून प्राप्त झालेला पुनर्प्रस्ताव आपण सर्वांनी वाचला आहे. त्याबद्दल काही सुचना असल्यास त्या आपल्या संस्थेमार्फत लवकरात लवकर संघाकडे पाठवाव्यात जेणेकरुन विकासकाबरोबर चर्चा-विनिमय करुन पुढील वाटचाल करता येईल.

संघाची भूमिका नेहमीच सहकार्याची व सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची होती, आहे व राहील हे आम्ही नम्रपणे निवेदन करतो.

**आपल्या सहकार्याबद्दल व एकजुटीबद्दल पुनश्च आपले जाहिर आभार....!**

**धन्यवाद..!**

**आपले नम्र,**

**( नंदकुमार मा. काटकर )**
**अध्यक्ष**

**( जयसिंग शि. भोसले )**
**सरचिटणीस**